# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# आई-वडिलांचा श्वास सुरू आहे तोपर्यंत त्यांना जीव लावा : प्रा. वसंत हंकारे

पाटण, दि. २ : आयुष्यभर काबाडकष्ट करून मुलांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र राबणाऱ्या आई-वडिलांना त्यांच्या अखेरच्या काळात विसरू नका. आई-वडिलांनी तुमच्यात पाहिलेली स्वप्ने पूर्ण करा. जोपर्यंत आई-वडिलांचा श्वास सुरू आहे तोपर्यंत त्यांना जीव लावा. त्यांचा विश्वासघात करू नका. त्यांना समजून घ्या तुमचे आयुष्य उज्ज्वल होईल, असा संदेश प्रा. वसंत हंकारे यांनी दिला.

महिला दिनाचे औचित्य साधून पाटण येथील आधार जनसेवा सामाजिक संस्थेच्यावतीने कोयना एज्युकेशन सोसायटीच्या हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या मैदानावर 'भरकटलेली तरुणाई व समजलेले आई-बाप समजून घेताना' या विषयावर ते बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संस्थेचे संस्थापक सुनील क्षीरसागर, संस्थापक-अध्यक्ष प्रकाश गायकवाड, आधार संस्थेचे अध्यक्ष अनिल मोहिते, कार्याध्यक्ष गणेश बिचकर, संजय बोंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.



मार्गदर्शन करताना प्रा. वसंत हंकारे व समोर उपस्थित. (गजानन पोतदार)

प्रा. हंकारे म्हणाले, मोबाइलच्या दुनियेत आजची तरुणाई भरकटलेली आहे. मुलांचे चांगले शिक्षण, चांगले भवितव्य घडविण्यासाठी आई-बाप दिवस-रात्र काबाडकष्ट करून रक्ताचे पाणी करत आहेत. मुलांचा प्रत्येक शब्द, प्रत्येक हट्ट मनाला व शरीराला कितीही कष्ट दुःख सहन करावे लागले तरी ते पूर्ण करण्यासाठी राबत असताना या कष्टापाठीमागे आई-वडिलांना किती वेदना सहन कराव्या लागल्या याची जाणीव आजच्या तरुणाईला राहिलेली नाही. आई-वडिलांच्या समोर उभे राहून त्यांच्या डोळ्यात पाहून तुमच्यासाठी केलेले कष्ट आठवा व त्यांच्याशी प्रामाणिक रहा.

अध्यक्ष अनिल मोहिते यांनी प्रास्ताविकात आधार जनसेवा सामाजिक संस्थेने आजपर्यंत राबविलेल्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. कविता फाटक यांनी सूत्रसंचालन केले. सोमनाथ आग्रे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आधार सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी, तरुण, पालक उपस्थित होते.

महिला दिनाचे औचित्य साधून गटशिक्षणाधिकारी दीपा बोरकर, संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते शौर्यपदक प्राप्त कु. हर्षदा देसाई, युवा उद्योजिका पुरस्कारप्राप्त संजीवनी खांडके, जलसंपदा विभागात नियुक्ती झाल्याबद्दल कु. ऐश्वर्या मोहिते, न्यायालयात लिपिकपदी नियुक्ती झालेबद्दल कु. प्रतीक्षा भोई यांच्यासह सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकार विद्या म्हासुर्णेकर, पत्रकार संतोषी जगदाळे यांचा आधार संस्थेमार्फत यथोचित गौरव करण्यात आला.